**<u>प्रेस नोट दिनांकः- ३०/०५/२०१९</u>**
**<u>चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर</u>**
**<u>जेष्ठ नागरीक यांची बैठक घेतलेबाबत</u>**

दिनांक ३०/०५/२०१९ रोजी १८.०० वा. ते १८.४० वा. दरम्यान मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, यांनी जेष्ठ नागरिकसंघ चंदननगर येथे भेट देऊन त्यांची बैठक घेतली. सदर मिटींगमध्ये जेष्ठ नागरीकांशी सुसंवाद साधुन त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे निरसन केले. चंदननगर पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही जेष्ठ नागरिकाची तक्रार असेल त्यांनी पोलीसांशी संपर्क साधावा, त्यांची तात्काळ तक्रार नोंदवुन घेतली जाईल अशी माहीती दिली. तसेच पोलीस आयुक्तालयामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी स्थापन केलेल्या भरोसा सेलच्या योजनेबाबत त्यांना माहीती दिली. त्याचप्रमाणे एकटे रहाणाऱ्या जेष्ठ नागरीकांसाठी पोलीसांच्या दत्तक योजनेची माहिती देवुन, ओळखपत्राबाबत चर्चा करुन माहीती दिली. महीलांसाठी १०९१ हेल्पलाईन नंबर बाबत माहीती देऊन कोणत्याही जेष्ठ नागरिकास काहीही अडचण असेल तर चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधने बाबत माहिती दिली. सदर ठिकाणी २० ते २५ जेष्ठ नागरीक जनसमुदाय हजर होता.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर पोहवा. दत्तात्रय शेळके, पोशि अमोल कोडीलकर यांनी केलेली आहे. सदर सुसंवादाचे घेण्यात आलेले फोटो खालीलप्रमाणे:-

